Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०२ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२७ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# राहुल गांधींना 'समजदार' होण्यासाठी ५२ वर्षे लागली

## त्यांना सर्व समजण्यासाठी ५० वर्षे लागतील–नवनीत राणा

अमरावती (वृत्तसंस्था)–काँग्रेस पक्षातील कार्यकर्ते देखील आता राहुल गांधी समजदार झाले असल्याचे म्हणत आहे. जर एखाद्याला समजदार होण्यासाठी ५२ वर्ष लागत असतील, तर यावरूनच त्यांची स्थिती लक्षात येते. या देशातील महिलांची संपत्ती खेचून घेण्याची चर्चा ते करत असतील तर तुम्ही त्यांना काय बोलणार? एखाद्या व्यक्तीला समजदार होण्यासाठी ५२ वर्ष लागत असतील तर त्याविषयी मी काय बोलू? असा प्रश्न अमरावती लोकसभा मतदार संघातील भाजप उमेदवार नवनीत राणा यांनी व्यक्त केला आहे. या देशाचे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर यांनी लिहिलेले आहे. 'जब तक सुरज चांद रहेगा, तब तक बाबासाहेब आंबेडकर का संविधान रहेगा' मात्र, ५२ वर्षाच्या समजदार व्यक्तीला हे सर्व समजण्यासाठी अजून ५० वर्षे लागतील, अशा शब्दात नवनीत राणा यांनी राहुल गांधी यांच्यावर हल्ला चढवला.




लोकसभा निवडणूक ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी आहे. ही निवडणुकी देशाच्या पंतप्रधान पदासाठी आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा निवडणुकीचे मैदान जिंकतील, असा विश्वास नवनीत राणा यांनी व्यक्त केला आहे. अमरावतीतील जनतेसाठी मी गेली पाच वर्ष काम करत आली आहे. त्यामुळे अमरावतीतील जनता मला नक्की आशीर्वाद देतील, असा दावा देखील नवनीत राणा यांनी केला आहे.मतदानाच्या दिवशी सर्वात आधी मी हनुमान चालीसा पठाण करून घरातील ज्येष्ठ मंडळाचा आशीर्वाद घेतला असल्याचे नवनीत राणा यांनी सांगितले आहे. अमरावतीच्या जनतेला हे माहिती आहे की, हे मतदान देशासाठी मतदान आहे. त्यामुळे अमरावती जनता आपल्या सुनेला आणि भारतीय जनता पक्षाच्या या छोट्या कार्यकर्तीला नक्की आशीर्वाद देतील, असा विश्वास देखील नवनीत राणा यांनी व्यक्त केला आहे. निवडणुकीत माझ्या विरोधात उभे असलेल्या सर्व उमेदवारांना मी माझ्या शुभेच्छा देत असल्याचे देखील नवनीत राणा यांनी म्हटले आहे. विकासासाठी हे मतदान होईल, असा दावा देखील नवनीत राणा यांनी केला आहे.विकासाच्या मुद्द्यावरच आम्ही निवडणुकीची लढाई लढत असल्याचा दावा नवनीत राणा यांनी केले आहे. एका शहरात राहत असल्यामुळे सर्वच आमचा परिवार आहे. त्यामुळे माझ्या विरोधातील सर्व उमेदवारांना शुभेच्छा देखील नवनीत राणे यांनी दिल्या आहेत. हा देश आमच्यासाठी सर्वात महत्त्वाचा परिवार आहे. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर आणण्यासाठी, अमरावतीतील जनता भारतीय जनता पक्षाला मतदान करतील असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. अमरावतीच्या जनतेच्या प्रत्येक डोळ्यामध्ये आज 'खिलता हुआ कमल' दिसत असल्याचे नवनीत राणा यांनी म्हटले आहे.

## 'त्या' रानटी हत्तीच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या वृद्ध महिलेचा अखेर उपचारादरम्यान मृत्यू

**गडचिरोली । प्रतिनिधी**

भामरागड तालुक्यातील हिदूर येथील एका महिलेचा रानटी हत्तीच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. २५ एप्रिल रोजी कियर येथील गोंगलू रामा तेलामी या शेतकऱ्यास दुपारी ठार केल्यानंतर रात्री त्याच रानटी हत्तीने हिदूर गावात धुडगूस घालून तीन महिलांना गंभीर जखमी केले. त्यापैकी राजे कोपा हलामी (५०) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर महारी देवू वड्डे (५०) आणि वंजे जुरू पुंगाटी (४७) या दोघी गंभीर जखमी आहेत.

कळपातून भरकटलेल्या या हत्तीने तेलंगणा राज्यात दोन शेतकऱ्यांना ठार करून दोन दिवसांपूर्वी भामरागड तालुक्यात प्रवेश केला. २५ एप्रिल रोजी पहाटे या तालुक्यातील कोसफुंडी गावात सर्वप्रथम हत्तीचे दर्शन झाले. त्यानंतर तो



कारमपल्ली–टेकला मार्गे कीयर जंगलात गेला. दुपारी ४ वाजताच्या सुमारास कियर येथील शेतशिवारात काम करीत असलेल्या गोंगलू तेलामी नामक शेतकऱ्याला पायाखाली तुडवून ठार केले. त्यानंतर हा हत्ती त्या भागातून पसार होऊन आरेवाडा वरून दोन किलोमिटर वर असलेल्या हिदूर या गावात गेला.

याठिकाणी सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास सुरु असलेल्या माता पूजनाच्या कार्यक्रमात त्याने धुडगूस घालून महारी वड्डे, राजे आलामी व वंजे पुंगाटी यांना गंभीर जखमी केले. २५ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास तिन्ही महिलांना भामरागड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र दुखापत गंभीर स्वरूपाची असल्याने त्यांना चंद्रपूरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. उपचारादरम्यान राजे कोपा हलामी (५०) हिचा रुगणल्यात मृत्यू झाला.तेलंगाना राज्यात दोन शेतकऱ्यांचा बळी घेणाऱ्या रानटी हत्तीने महाराष्ट्रात प्रवेश करत सिरोंचा वनविभागातील रेपणपल्ली वनपरिक्षेत्रात तब्बल १८ दिवस मुक्काम ठोकून बाहेर पडताच भामरागड तालुक्यात आणखी दोन बळी घेतला. त्यामुळे या रानटी हत्तीच्या हल्ल्यात बळी गेलेल्या निष्पाप लोकांची संख्या आता चार वर पोहोचली आहे.

सदर रानटी हत्ती भामरागड वनपरिक्षेत्रातून पुढे छत्तीसगड राज्यातील जंगलात जाण्याची शक्यता आहे. आणखी जीवित हाणी होऊ नये म्हणून वनविभागाच्या वतीने प्रत्येक गावात दवंडी देवुन गावकऱ्यांना घराच्या बाहेर एकटे रात्री–अपरात्री निघण्यास मनाई केली आहे. तसेच जिल्हा प्रशासन व तालुका प्रशासन भामरागड यांची मदत घेवून हत्ती दिसल्यास त्याच्याशी छेडखानी न करता तात्काळ वन विभागास माहिती देण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

## अज्ञात कार चालकाने मोटार सायकल स्वाराला उडवले

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगावपासून ७ किमी अंतरावर असलेल्या सोरटा फाटा येथे एका कार चालकाने मोटारसायकल स्वाराला उडवले व घटनास्थळावर ४५ वर्षीय विष्णू जयराम गेटमे जखमी झाले. पुलगाव ग्रामिण रुग्णालय येथे उपचार केल्यानंतर सावंगी रुग्णालयात नेत असतानाच मृत्यू झाला.पुलगाव पोलीस फरार कार चालकाच्या शोधात गुंतले आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार विष्णू जयराम गेटमे हे येथील पुलगाव बाजारपेठेत आले होते.दुपारी ३–



३० ते ४ च्या दरम्यान घटना घडली. मयत विष्णूच्या कुटुंबात पत्नी, आई आणि तीन मुलींचा समावेश आहे.

## प्रत्येक लोकसभा मतदारसंघात सभा घेणारा पंतप्रधान पाहिला नाही–वडेट्टीवार

**नागपूर**–पंतप्रधान नरेंद्र मोदी एवढ्या सभा का घेत आहे याचे आश्चर्य वाटत आहे. भाजपच्या सर्वे किंवा आयबी इंटेलिजन्स सर्विसेसचा रिपोर्टमध्ये पराभव होणार असे आले असेल, म्हणून ते सभा घेत आहे. सत्तर वर्षात प्रत्येक लोकसभा मतदारसंघांमध्ये सहभाग घेणारे पंतप्रधान आम्ही पाहिलेच नाही, असा टोला विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हाणला.शरद पवारांनी सभेत मोदींचा व्हिडिओ दाखवला. त्यावर बोलताना फडणवीसांनी आम्ही पवारांचे जूने व्हिडिओ काढले तर त्यांनी किती कोलांटउड्या मारल्या हे कळेल असा इशारा दिला. पण, नुसता इशारा देऊन थांबू नये. तर फडणवीसांनी व्हिडिओ एकदा काढूनच टाकावे.

## येनोली माल शाळेत शाळापूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील गोविंदपूर केंद्रा अंतर्गत येत असलेल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येनोली (माल) येथे शाळापूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी गावात फेरी काढून दाखल पात्र मुलांची गृहभेट व पालकांचे स्वागत हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. दाखलपात्र मुलांचे शाळेमध्ये सत्कार करून शाळेत लावलेल्या स्टॉलच्या माध्यमातून चाचणी घेऊन नोंद घेण्यात आली. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नरेश मडावी, शा. व्य. समिती उपाध्यक्ष योगेश्वर शेंडे, शा. व्य. समिती सदस्या आम्रपाली रामटेके, शा. व्य. समिती सदस्या साधना आत्राम, पालक दिवाकर खंडरे, ताराचंद बंडरे, योगेश्वर मसराम, सचिन कोवे, आदी पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रकाश कोयताडे यांनी केले संचालन विषय शिक्षक सुशांत कंदीकुरवार, यांनी केले तर आभार सह.शिक्षिका रंजना दोडके यांनी केले शाळापूर्व तयारी मेळाव्याचे विशेष आयोजन तथा सेल्फी स्टँड सह. शिक्षिका करुणा सोनटक्के आणि सह. शिक्षक आनंदराव बावनकर यांनी केले व कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## पुन्हा मोदीला संधी दिल्यास लोकशाही धोक्यात येईल–खा.शरदचंद्रजी पवार



**सांगोला । प्रतिनिधी**


गेल्या तीन वर्षात निवडणुका झाल्या नाहीत. शेतकऱ्यांची अवस्था वाईट झाली आहे. देशातील दोन मुख्यमंत्री तुरुंगात टाकले आहेत. अशा परिस्थितीत मोदींना पुन्हा संधी दिल्यास देशात हुकूमशाही येऊन लोकशाही निश्चितपणे धोक्यात येईल असा इशारा जेष्ठ नेते शरद पवार यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला.

सांगोला येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानामध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारसभेत शरद पवार बोलत होते.या सभेसाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, भूषण होळकर, प्रविण गायकवाड, उत्तम जानकर, माजी आमदार राम साळे, महाआघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जयमाला गायकवाड, सक्षणा सलगर, रामहरी रूपनवर, बाबुराव गायकवाड, पी. सी. झापके, भूषणराजे होळकर, शरद कोळी, साईनाथ अभंगराव, दत्ता टापरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, आज शेतकऱ्यांची वाईट अवस्था असून त्यांना शेतकऱ्यांविषयी त्यांना आस्था आहे याबाबत मला शंका आहे. मागणी नसताना कांदा निर्यात बंदी घातली. आज दूधधंदा वाढत असतानाही दुधाच्या किंमती खाली आणल्या आहेत त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था फारच वाईट झाली आहे. उसाचे उत्पादन सर्वाधिक घेतले असतानाही शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. तपास यंत्रणाचा गैरवापर करीत झारखंड व दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकले आहेत. सध्या लोकशाही धोक्यात आणून हुकूमशाही आणण्याचे काम सुरू आहे. गेल्या तीन वर्षात महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या विविध निवडणुका झाल्या नाहीत ही संसदीय लोकशाही धोक्यात आणण्याचे काम सुरू आहे. आपण सर्वांनी त्यांचा पराभव केला पाहिजे असेही पवार यांनी सांगितले.यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, सुरज बनसोडे, सक्षणा सरगर, पा. सी. झपके, भूषण होळकर, बाबूराव गायकवाड, उत्तम जानकर, शरद कोळी यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या निवडणुकीसाठी मी लोकांच्या आग्रहाखातर मैदानात उतयळरले आहोत. आज पाण्यावरून टीका केली जाते परंतु उजनीच्या व इतर पाण्याचे कोणतेही नियोजन केले जात नाही. यापुढे तुम्हा सर्वांना विश्वासात घेऊनच पाण्याची नियोजन केले जाईल. कोणाच्या सांगण्यावरून पाण्याचे नियोजन केले जाणार नाही. सांगोल्यातील देशमुख कुटुंबीय व मोहिते पाटील कुटुंबीय यांच्यात कधीही कोणत्याही कारणास्तव दुरावा येणार नाही एवढे मी निश्चितपणे सांगतो असेही धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितले.

# मॉर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीज!

**अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले. अशी ही ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी– अलककार– यांच्या या लेखात जरूर वाचा... संपादक.**

अमेरिकेच्या सरकारने या शोधाचे हक्क विकत घेण्यास नकार दिल्यावर मॉर्स यांनी स्वतःची कंपनी स्थापन केली. तारायंत्राचा प्रसार लवकरच झपाट्याने वाढला व बहुतेक देशांनी त्याचा वापर करण्यास सुरुवात केली. तथापि लगेचच मॉर्स यांच्यावर त्यांचे भागीदार व प्रतिस्पर्धी संशोधक यांनी शोधाच्या अधिकाराबाबत दावे लावले. अतिशय खर्चिक न्यायालयीन खटल्यांचा दीर्घ मालिकेनंतर इ.स.१८५४ साली अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मॉर्स यांचा एकस्व अधिकार मान्य केला. अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

मॉर्स– मोर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीझ हे अमेरिकन चित्रकार व विद्युत चुंबकीय तारायंत्राचे जनक होत. मॉर्स यांचा जन्म दि.२७ एप्रिल १७७१ रोजी चार्ल्सटाऊन– मॅसॅचूसेट्स येथे झाला. त्यांचे शिक्षण अँडोव्हर येथील फिलिप्स ॲकडमीत व पुढे येल कॉलेज येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्याकाळी फारसे आकलन न झालेल्या विद्युत या विषयावरील व्याख्यानामुळे त्यांना गोडी निर्माण झाली. त्याच वेळी त्यांना लघू व्यक्तिचित्रे काढण्याचा छंद जडला. तथापि त्यांच्या वडिलांना त्यांचा हा छंद पसंत नव्हता. सन १८१०मध्ये पदवी संपादन केल्यावर त्यांनी बॉस्टन येथील एका ग्रंथ प्रकाशकाकडे कारकुनाची नोकरी पत्करली. त्या काळचे प्रख्यात अमेरिकन चित्रकार वॉशिंग्टन ऑल्स्टन व गिल्बर्ट स्टूअर्ट यांनी मॉर्स यांच्या चित्रकलेच्या व्यासंगाला प्रोत्साहन दिले. सन १८११ साली ऑल्स्टन यांचे विद्यार्थी म्हणून ते इंग्लंडला चित्रकलेच्या अभ्यासासाठी गेले. तेथील त्या कलेच्या वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक शैलीचा– दंतकथा व ऐतिहासिक घटना यांच्या अद्भूत चित्रणाचा त्यांनी स्वीकार केला. तथापि १८१५ मध्ये ते अमेरिकेला परतले तेव्हा अमेरिकन लोकांना त्यांच्या ऐतिहासिक चित्रांत रस नाही, असे त्यांना दिसून आले. त्यामुळे नाइलाजाने त्यांना अर्थार्जनासाठी व्यक्तिचित्रे रंगविण्याचा व्यवसाय पुन्हा पत्करावा लागला. त्यांनी न्यू इंग्लंड, न्यूयॉर्क व द.कॅरोलायना या राज्यांत 'फिरते चित्रकार' म्हणून सुरुवात केली. इ.स. १८२५नंतर न्यूयॉर्क शहरात स्थायिक झाल्यावर त्यांनी काही अप्रतिम व्यक्तिचित्रे रंगवली. त्यांतील मार्क्विस दी लाफायेत यांची दोन व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत.

इ.स.१८१७मध्ये त्यांनी आपले धाकटे बंधू सिडनी एडवर्ड्स मॉर्स यांच्या समवेत पंपासंबंधीची तीन एकस्वे– पेटंटे मिळविली होती. संगमरवरावर कोरीव काम करण्याचे एक यंत्र त्यांनी सन १८२३मध्ये विकसित केले. त्यानंतर विद्युत विषयक प्रयोगांत त्यांनी सातत्याने विशेष रस घेतला. सन १८३२मध्ये फ्रान्सहून जहाजातून परत येतानाच्या प्रवासात चार्लस टी.जॅक्सन यांनी मॉर्स यांना लांब अंतरावर विद्युत प्रेषण करणारे व फ्रान्समध्ये मिळवलेले एक उपकरण दाखविले. यामुळे मॉर्स यांना विद्युत व तारायंत्र या विषयांत अधिक स्वारस्य निर्माण झाले. पुढील तीन वर्षे त्यांनी अनेक प्रयोग करून सन १८३५मध्ये पहिले विद्युत चुंबकीय तारायंत्र उपकरण केले. यात एक विद्युत मंडल चालू व बंद करून संकेत प्रेषण करणारा प्रेषक, संकेतांची नोंद करणारा विद्युत चुंबकीय ग्राही आणि संकेतांचे अक्षरे व संख्या यात रूपांतर करणारी सांकेतिक लिपी यांचा समावेश होता. त्यांनी योजलेली ठिपके– डॉट्स व प्रास– डॅशेस यांवर आधारलेली सांकेतिक लिपी अद्यापही त्यांच्या नावाने ओळखली जाते. ज्यात कट्ट व कड या दोन ध्वनींच्या साहाय्याने ठिपका व प्रास दर्शविले जातात. पुढे त्यांनी अधिक लांब अंतरावर संदेश पाठविण्यासाठी विद्युत चुंबकीय अभिचलित्रांच्या प्रणालीचा शोध लावला. त्यांच्या शोधाच्या विकासात त्यांना एल.डी.गेल व जोझेफ हेन्री यांचे तांत्रिक साहाय्य आणि ल्फ्रेड व्हेल यांचे आर्थिक साहाय्य लाभले. मॉर्स यांनी सन १८३७मध्ये आपल्या शोधाच्या एकस्वाकरिता अर्ज केला, परंतु त्यांना आपल्या शोधाला मान्यता मिळवण्यास जवळजवळ सात वर्षे वाट पहावी लागली. शेवटी सन १८४३मध्ये अमेरिकेच्या काँग्रेसने वॉशिंग्टन ते बाल्टिमोर यांच्या दरम्यान तारयंत्राद्वारे प्रायोगिक संदेशवहन प्रस्थापित करण्यासाठी तीस हजार डॉलरचे अनुदान मंजूर केले. दि.२४ मे १८४४ रोजी या योजनेद्वारे पहिला संदेश प्रेषित करण्यात आला.

मॉर्स यांच्यात नेतृत्वाचेही गुण होते. रंगभूमीवरील स्वैराचार विरुद्ध मोहीम उघडण्याचा एक भाग म्हणून त्यांनी सन १८२७मध्ये न्यूयॉर्क येथे जर्नल ऑफ कॉमर्स हे रंगभूमीसंबंधीच्या जाहिराती स्वीकारण्यास नकार देणारे नियकालिक स्थापन करण्यास मदत केली. चित्रकारांना मदत करण्यासाठी व अमेरिकन जनतेची कलाविषयक अभिरुची उंचावण्यासाठी नॅशनल ॲकडेमी ऑफ डिझाइन या सन १८२६मध्ये स्थापन झालेल्या संस्थेचे ते एक संस्थापक व पहिले अध्यक्षही होते. सन १८३२–३६ या काळात त्यांनी नेटिव्ह अमेरिकन चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. तिच्यातर्फे न्यूयॉर्क शहराच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणूनही ते उभे राहिले होते. परंतु राजकारणातील त्यांचा सहभाग अयशस्वी ठरला. सन १९२२मध्ये ते युरोपला गेले आणि तेथे अभ्यास, प्रवास व चित्ररेखाटन यांत तीन वर्षे त्यांनी खर्च केली. सन १८३२मध्ये अमेरिकेला परतल्यावर न्यूयॉर्क विद्यापीठात चित्रकला व शिल्पकला या विषयांच्या प्राध्यापकपदावर त्यांची नेमणूक झाली. पुढे तेथेच ते संकल्प चित्रकलेच्या वाङ्मयाचे प्राध्यापक झाले होते.

मॉर्स यांचे देहावसान वयाच्या ९९व्या वर्षी न्यूयॉर्क येथे दि.२ एप्रिल १८७२ रोजी झाले. त्यांच्या मृत्यूनंतर तारायंत्राचे जनक ही त्यांची कीर्ती दूरध्वनी, रेडिओ व दूरचित्रवाणी यांच्या शोधामुळे पुसट होत गेली, तथापि चित्रकार म्हणून त्यांची ख्याती मात्र वाढली आहे. त्यांची व्यक्तिचित्रे जगातील अनेक संग्रहालयांत प्रदर्शित केली गेलेली आहेत. त्यांचे तारायंत्र उपकरण वॉशिंग्टन येथील नॅशनल म्युझियम ऑफ हिस्टरी अँड टेक्नॉलॉजी या संग्रहालयात जतन करून ठेवण्यात आले आहे.

!! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या लोकोपयोगी संशोधनास विनम्र अभिवादन !!

# देशातील महत्त्वपूर्ण कामे मोदींच्या नेतृत्वा खाली पूर्ण–पालकमंत्री चंद्रकांत पाटील

**नातेपुते :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशात अतिशय महत्त्वपूर्ण कामे झालेली आहेत. त्यामध्ये महिलांसाठी शौचालय, गॅस, मोफत रेशन, पाच लाखांपर्यंत मोफत औषधोपचार आणि प्रत्येक घरात नळाद्वारे शुद्ध पाणी,
महिलांना बसमध्ये पन्नास टक्के सवलत, मुलींना शालेय फी माफ इत्यादी कामे केल्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत फक्त आणि फक्त मोदींसाठी प्रत्येकाने मतदान करावे, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.नातेपुते येथील चैतन्य मंगल कार्यालयात भारतीय जनता पक्ष व सर्व मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी मनसेचे अप्पासाहेब कर्चे, शिवसेना शिंदे गटाचे सतीश सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सुरेश पालवे,अक्षय भांड, रमेश पाटील, के. के. पाटील इत्यादींनी मार्गदर्शन केले. पाटील म्हणाले, जगात सर्वात मोठा देश भारत असून लोकशाही मानणारा हा देश आहे. आपणास अनेक क्रांतिकारक निर्णय घेण्यासाठी भक्कम



सरकारची गरज आहे.गेल्या दहा वर्षात देशात एकही दंगल, बॉम्बस्फोट झाला का? प्रत्येक जागा महत्त्वाची आहे. ही लढत मोहिते पाटील विरुद्ध नाईक निंबाळकर अशी नसून ही देशाच्या अस्मितेची लढत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे त्रिदेव प्रत्येकाचा हिशेब घेण्यास खंबीर आहेत.ते कुणाचा हिशेब शिल्लक ठेवणार नाहीत. यावेळी अप्पासाहेब कर्चे यांनी जोरदार भाषण करून वास्तव सर्वांसमोर मांडले. बाळासाहेब सरगर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी मंचावर सोपानराव नारनवर, भानुदास राऊत, राजकुमार पाटील, सुरेश पालवे,बाजीराव काटकर, जयकुमार शिंदे, हणमंत सुळ, हनुमंतराव ढालपे, विजयकुमार उराडे, दादासाहेब उराडे, रमेश पाटील, प्रवीण काळे, देविदास चांगण, राहुल पद्मन, गणेश पागे, सुधीर काळे, संजय देशमुख, शशी कल्याणी, मित्र पक्षांचे पदाधिकारी, ग्रामीण भागातील कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्थित होते.के के पाटील म्हणाले, दोन–दोन पिढ्या संघर्ष केला आहे. मार खाल्ला आहे. शेतीवर बोजा चढवलेला आहे. कृष्णा–भीमा स्थिरीकरणासाठी मोहिते पाटील भाजपमध्ये गेलेले नव्हते. तर ते स्वतःला स्थिर करण्यासाठी गेले होते. तुमच्या अडचणी सोडवायला तुम्ही आला होता. तुम्हाला आमदार केले, बंद पडलेला सदाशिवनगर साखर कारखाना सुरू करून दिला. तरीही तुम्ही फसवणूक केली आहे. पण लोक आता जागृत झाले आहेत. त्यामुळे कोणाला गृहीत धरू नका, असा सल्लाही त्यांनी दिली.

# भाजपच सोडवेल कोळी समाजाचे प्रश्न–आ.पाटील

**सोलापूर :** देशाच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सर्वात सक्षम पर्याय आहेत. भाजपची सत्ता आल्यास कोळी समाजाचे प्रश्न प्राधान्याने सोडवले जातील, असा विश्वास आहे. त्यामुळे कोळी महासंघाने भाजप महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना पाठिंबा दिल्याचे महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आमदार रमेश पाटील यांनी सांगितले.

गुरुवारी (ता. २५) येथील शांतिसागर मंगल कार्यालयात कोळी समाज संघटनेची शिखर संस्था असलेल्या कोळी महासंघाचा मेळावा झाला. यात ते बोलत होते. आमदार पाटील म्हणाले, ऊसतोड कामगाराचा मुलगा राम सातपुते यांच्या रूपाने लोकसभेत निवडून जात आहे. त्यांना समाजाच्या प्रश्नांची जाण आहे.सोलापूरचा सर्वांगीण विकास करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १० वर्षांच्या काळात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात मोठे सकारात्मक बदल झाले आहेत. सोलापूर शहर जिल्ह्यातील सर्व कोळी बांधवांनी भाजप महायुतीचे उमेदवार



सातपुते यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे.यावेळी माजी महापौर श्रीकांचना यन्नम, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, सोलापूर जिल्हा कोळी महासंघाच्या सरचिटणीस सुरेखा होळीकट्टी, अरुण लोणारी, प्रकाश बोबडे, देवानंद भोईर, सतीश धडे, चंद्रकांत घोडके, शिवशंकर घुले, लक्ष्मण शिरसाट, विक्रम शिरसाट आदी उपस्थित होते. अरुण लोणारी यांनी प्रास्ताविक केले. प्रमोद सलगर यांनी सूत्रसंचालन केले. महासंघाचे सचिव सतीश धडे यांनी आभार मानले.भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते म्हणाले, कोळी समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आगामी काळात प्राधान्याने प्रयत्न करण्यात येतील. शासनस्तरावर प्रलंबित प्रश्नांचा निपटारा करण्यासाठी मी कटिबद्ध राहीन. सोलापूरला २५ वर्ष पुढे घेऊन जाण्यासाठी कोळी समाज बांधवांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप महायुतीला साथ द्यावी.

## व्यापाऱ्यासाठी विविध सुविधा निर्माण करणार

# खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी व्यापारी, हमाल आणि मापाडी यांच्याशी साधला संवाद

**अहमदनगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगरी मधील व्यापाऱ्यासाठी महायुतीच्या सरकारच्या मार्फत विविध सेवा सुविधा निर्माण करण्याचे आश्वासन महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिले. नेप्टी बाजारपेठेतील मधील कांदा मार्केट मध्ये प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी व्यापारी हमाल आणि मापाडी यांच्याशी संवाद साधला.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या लोकसभा मतदार संघात प्रचार सभा, कॉर्नर मिटींग आणि गाठी भेटी देण्यावर भर दिला आहे. याच निमित्ताने ते आज नगर शहरातील कांदा मार्केट मध्ये व्यापारी, हमाल आणि मापाडी यांच्याशी संवाद साधत होते. यावेळी त्याच्यासोबत आमदार संग्राम जगताप, उद्योगपती सचिन कोतकर, अविनाश घुले, निखील वारे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी खा. विखे यांनी व्यापाऱ्यांना विश्वास दिला की, महायुती



सरकार हे व्यापाऱ्याच्या जोडीला आहे. व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक मुलभूत सेवा सुविधांवर सरकारच्या वतीने भर दिला जाईल. तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा पुरेपुर लाभ व्यापाऱ्यांना मिळण्यासाठी त्यांच्याकडून विशेष प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले. तसेच नारायन डोह येथील नवीन रेल्वे स्थानकात कांदा व्यापाऱ्यांसाठी रल्वे धक्का निर्माण केला जाईल.त्यामुळे नगर कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा व्यापाऱ्यांना भारतभर कांद्याचा व्यापार करता येईल.विळद येथील नवीन एमआयडीसी मध्ये केंद्र सरकारच्या माध्यमातून कांद्यावर प्रकिया करण्यासाठी प्रोसेसिंग युनिट उभारणी केली जाईल. चिचोंडी पाटील येथे जनावरांचा बाजार उभा करून पशु व्यवसायाला चालणा देण्याचे काम केले जाईल. त्याच कांद्याच्या साठवणुकीसाठी जागा उपलब्ध करून देणार अशा पद्धतीने व्यापाऱ्यांना सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तर सरकार दरबारी असलेले हमाल, मापाडी वर्गाचे विविध प्रश्न प्राथमिकतेच्या जोरावर सोडविले जातील असे ही ते म्हणाले. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेहमीच गरिबांच्या सोबतीला आहेत. हमाल आणि मापाडी, माथाडी कामगार यांच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या कामांची त्यांनी माहिती दिली.व्यापारी वर्गासाठी मोदी सराकारनेमागील १० वर्षात विविध योजना आणुन त्या प्रभावीपणे राबविल्या आहेत.यामुळे पुन्हा व्यापाऱ्यांच्या हितासाठी नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करणे गरजेचे आहे. आपले एक मत हे मोदींच्या पंतप्रधान पदाचा मार्ग बळकट करण्यासाठी आहे. यासाठी महायुतीच्या बीड मधून पंकजा मुंडे आणि नगर मधून आपल्याला मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# माध्यम कक्ष व आचारसंहिता कक्षास निवडणुक निरीक्षकांनी दिली भेट




**अहमदनगर | प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षास व आचारसंहिता कक्षास निवडणूक निरीक्षक (जनरल) रवी कुमार अरोरा व निवडणूक निरीक्षक (पोलीस) पी. अरवींदन यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पहाणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, अपर जिल्हाधिकारी तथा आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी सुहास मापारी, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी डॉ. रवींद्र ठाकुर, कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे सदस्य महेश देशपांडे आदी उपस्थित होते.

यावेळी निरीक्षकांनी सर्वप्रथम माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या कामकाजाची पहाणी करत माध्यम कक्षात बसविण्यात आलेल्या दूरचित्रवाणी संचावरून विविध वाहिन्यां, स्थानिक केबल वाहिन्यांवरून प्रसारित होणाऱ्या जाहिराती, बातम्या निरीक्षणाच्या कामाची पाहणी केली. कक्षात दररोज येणा–या विविध वृत्तपत्रांतील बातम्यांच्या कात्रणाच्या संचाचीही निरिक्षकांनी यावेळी पाहणी केली. आचारसंहिता कक्षाच्या कामकाजाची पहाणी करत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या एसएसटी,व्हीएसटी, एसएसटी पथकांच्या कामांची माहिती जाणुन घेतली. या कालावधीत जप्त करण्यात आलेल्या रक्कमेची माहिती घेत याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी सुहास मापारी यांनी आचारसंहिता कक्षाच्या कामकाजाबाबत तर जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी डॉ. रवींद्र ठाकुर यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाबाबत निवडणूक निरीक्षकांना माहिती दिली.

# मोदींकडे मांडायला कोणतेच मुद्दे नाहीत:त्यांच्या भाषणात सतत माझ्यावर टीका असते–शरद पवार

**धाराशिव (वृत्तसंस्था)**

मोदी, अमित शहा यांचे भाषण ऐका, सर्वात जास्त माझ्यावर टीका असते. भाजपला त्यांचा पराभव आता स्पष्टपणे दिसतोय असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आणि प्रचारगीत आज प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यापूर्वी धाराशिवमध्ये ते पत्रकारांशी संवाद साधत होते.

यावेळी शरद पवार म्हणाले, ''मोदी असोत किंवा अमित शहा, त्यांच्या भाषणात सतत फक्त माझ्यावर, उद्धव ठाकरेंवर टीका असते. गेल्या १० वर्षांपासून ते सत्तेवर आहेत. त्या काळात त्यांनी काय केले? त्याचा लेखाजोगा त्यांनी आधी जनतेसमोर मांडायला पाहिजे, उगीच मागच्या गोष्टी काढू नये'' असे शरद पवार म्हणाले.पुढे शरद पवार यांनी मोदींवर टीका केली आहे. मोदींकडे मांडायला काही नाहीच, लोकांना सांगायला काही नाही म्हणून ते आमच्यावर आरोप करत आहेत. त्यांच्याकडे दुसरे काही उद्योग नाहीत. आता जनतेने मोदींचा पराभव करण्याचा निर्णय घेतला आहे असे पवार म्हणाले.दरम्यान, पवार साहेबांनी किती कोलांट्या उड्या मारल्या याचे व्हिडीओ दाखवले, तर अवघड होईल, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर नुकतीच टीका केली. त्याला आता शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. फडणवीस काय म्हणतात त्याला अर्थ नाही. आपला पराभव होतोय हे आता त्यांच्या लक्षात येतंय असे पवार म्हणाले.यापूर्वीही शरद पवार यांनी भाजप सरकार आणि मोदी यांच्यावर अनेकवेळा निशाणा साधला होता. कालच सोलापूरच्या माढा लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीची सभा झाली. यावेळी शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक जुना व्हीडिओ दाखवला. शरद पवारांनी नरेंद्र मोदींचे जुनं भाषण ऐकले. गेले दहा वर्षे देशात भाजपकडं सत्ता आहे. मोदींच्या हातात देशाचा कारभार आहे. मात्र निवडणुकीआधी दिलेली आश्वासने पाळली गेली नाहीत. लोकांची फसवणूक सुरू आहे'', असे शरद पवार म्हणाले होते.

# ही तर पंकजाताईंच्या विजयाची रॅली

## बीडच्या विराट सभेत महायुतीच्या एकजुटीचे दर्शन







**बीड । प्रतिनिधी**

नि:स्वार्थ प्रेम करणारी जनता माझ्यासोबत आहे. जिल्ह्यातील सर्व जनता हेच माझे वैभव आहे, मात्र कांही जणांची दृष्ट याला लागते. निवडणूकीत गाफील राहू नका. मी एका पराभवाला सामोरे गेले आहे. पराभवानंतर जनतेच्या साक्षीने मी समाजकारणात राहिले.अग्निपरीक्षेत मी तावून सुलाखून निघाले, त्यानंतर आता मला संधी मिळाली आहे. ही निवडणूक अवघड आहे. मी म्हणजे गोपीनाथ मुंडे असे म्हणणार नाही, कारण ज्या दिवशी मुंडे साहेबांच्या गळ्यात हार घालायचा होता, त्याचवेळी त्यांचेवर अंत्यसंस्कार करायची वेळ आली. त्यामुळे आपले त्यांचे अधुरे राहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी या लोकसभेत आपल्याला विजयी व्हायचे आहे. आपल्याला एकदा दूध पोळले आहे, आता ताकही फुंकून प्यायचे, म्हणून गावागावात जा, प्रचार करा, जिल्ह्याला विकासाच्या उंचीवर घेवून जाण्यासाठी मला अधिकाधिक मताधिक्य देवून विजयी करा असे आवाहन भाजपा महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी आज येथे केले.

दरम्यान,जिल्ह्यात सात लाख हेक्टर जमीन जिरायत आहे, म्हणून बीड जिल्ह्यातील लोक ऊसतोडायला जातात. मनगटात ताकद पण शेतात पाणी नसल्यामुळे या जिल्ह्यातील लोक दुसर्याच्या शेतात कामाला जातात. हे चित्र बदलण्यासाठी बीड जिल्ह्याच्या विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक करत तुमच्या विकासासाठी सक्षमपणे काम करणार्या भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंना प्रचंड मताधिक्क्याने निवडून द्या असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री तथा पालकमंत्री पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. स्वत:ला शेतकरी पुत्र म्हणवून घेणार्या आपल्या विरोधी उमेदवाराने सर्वात आधी मराठा आरक्षणाचा लाभ घेत त्या आधारे केजमध्ये लोकल निवडणूक लढवली .ज्यांच्याकडे विकासाची दृष्टी नाही त्याला तुम्ही निवडून देणार का? आपल्या समोरचा उमेदवार बहुरंगी आहे अशा शब्दात त्यांनी विरोधकावर सडकून टिका केली. ही लोकसभा निवडणूक मुद्दामहून जातीवर जातेय, हे चूकीचे आहे. आमची जात काढली जात आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आमचा कोणाचा कधीच विरोध नव्हता. पंकजाताई मुंडे यांनी जात-पात-धर्माच्या पलीकडे जावून जिल्ह्याच्या विकासासाठी योगदान दिले आहे. त्यामुळे जातीधर्माच्या नव्हे तर विकासाच्या मुद्यावर जिल्ह्याला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी पंकजाताईंना बहुमताने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज आपला उमेदवारी दाखल केला. त्यानंतर पारस ग्राऊंडवर आयोजित महारॅलीचे रूपांतर विराट विजयी संकल्प सभेत झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. पालकमंत्री धनंजय मुंडे, खा. डॉ.प्रीतमताई मुंडे, आ.प्रकाश सोळंके,आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे, आ.लक्ष्मण पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी आ.अमरसिंह पंडीत यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, कुंडलिक खांडे, यश:श्री मुंडे, अक्षय मुंदडा, योखेश क्षीरसागर आदींसह महायुतीच्या घटकपक्षांचे नेते, जिल्हाप्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले. आजची ही सभा पंकजाताई मुंडे यांच्या विजयाची नांदी आहे. पंकजाताई केवळ खासदार म्हणून निवडून येणार नाही तर केंद्रीय मंत्री होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सत्तेत असताना पंकजाताईंनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे काम केले. त्यामुळे या निवडणूकीत जाती-पातीचे राजकारण करणार्यांना उत्तर देवून विकासाच्या मुद्यावर आपल्या सर्वांना पंकजाताईंना निवडून द्यायचे आहे असे आवाहन त्यांनी केले. सभेच्या प्रारंभी बाळासाहेब दोडतले, कल्याण आखाडे, मनसे जिल्हाध्यक्ष सुंमत धस, प्रा.पी.टी.चव्हाण,सलीम जहाँगीर, अनिल जगताप, अनिल तुरुकमारे, विजयसिंह पंडीत, माजी आ.भीमराव धोंडे, रमेश आडसकर, आ.बाळासाहेब आजवे, आ.लक्ष्मण पवार, आ. प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, खा.डॉ. प्रितम मुंडे यांची समयोचित भाषणे झाली.याप्रसंगी हजारोंच्या संख्येने उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या,माझा बाप भरल्या ताटावरुन गेला, तेव्हा तुम्ही सर्व जनता सर्व माझे आधार झालात. त्यामुळेच तुम्ही मला प्रिय आहेत. माझ्यावर खूप लोकांचे स्वप्न साकारण्याची जबाबदारी होती. धनंजय मुंडेंनी आता स्पष्ट करुन टाकलयं की, जिल्ह्याचा अन् घरातला पालक म्हणून पंकजाताईंच्या विजयाची जबाबदारी घेतली हे खूप आनंददायी आहे. मी पालकमंत्री असताना विकासाच्या शक्य होईल त्या प्रत्येक योजना अनेक ठिकाणी मंजूर केल्या. शासनाकडून विकासांचा कोट्यावधी रुपयांचा निधी जिल्ह्याच्या विकासासाठी आणला. माझी नियती स्पष्ट आहे, मन कलुषित नाही, त्यामुळे मागच्या निवडणूकीत आवाहन केल्यानंतर जनतेने प्रितमताईला प्रचंड मते दिली होती. आता माझ्यासाठी मते मागत आहे, मला शेवटची संधी द्या, सर्व जाती-धर्माच्या समाज बांधवांना माझे आवाहन आहे, मला पैसे कमवायचे नाहीत की, प्रसिध्दी मिळवायची नाही तर केवळ जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे.

घडी गेली की, पिढी जाते, पाच वर्ष मी घरी बसले, मी तुमच्यासाठी तळतळले आहे. ही निवडणूक देशाची आहे. बीड जिल्हा जातीधर्माच्या नव्हे तर विकासाच्या कायम पाठीशी राहतो असा संदेश जनतेने या निवडणूकीतून द्यावा. देशाची धूरा पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती सोपवण्यासाठी विश्वासाने मला बीडचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी द्या, तुमच्या मताआधारे जिल्ह्याचा विकास करुन मी तुमचे मतरुपी कर्जाची परतफेड करेन असा विश्वासही पंकजाताईंनी हजारोंच्या संख्येने उपस्थित जनसमुदायाला दिला. बीड जिल्ह्यातील जनतेचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबध्द असेन. मी दिलेला शब्द पाळते, त्यामुळे मला सन्मानाने दिल्लीला पाठवण्यासाठी प्रचंड मताधिक्क्याने विजयी करा असे आवाहनही पंकजाताई मुंडे यांनी केले.देशाची सुत्रे पुन्हा कोणाच्या हाती सोपवायची हे ठरवणारी ही निवडणूक आहे. धनगर, माहेश्वरी, तेली, मराठा असो की वंजारी या सर्व जाती-धर्माच्या उमेदवारांना खासदार म्हणून निवडून दिले. जिल्ह्याचा पालकमंत्री अन् घरातला पालक म्हणून मला पंकजाताईला निवडून आणण्याची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे प्रितमताईंना जरी ही निवडणूक पाहून मोकळं अन् हलक-हलक वाटत असेल तितकं मला वाटत नाही. जिल्ह्यातील जनतेने इतिहासात कधीच कोणाही उमेदवाराची जात-पात-धर्म न पाहता केवळ त्या व्यक्तीची कर्तबगारी पाहून संसदेत पाठवले. आज आता तीच वेळ आली आहे. त्यामुळे पंकजाताईचे सक्षम नेतृत्व आपल्या सर्वांसमोर आहे.दुसरीकडे आपल्या समोरचा उमेदवार बहुरंगी आहे. त्यांच्या पक्षाचे राज्याचे अध्यक्ष जयंत पाटील बीडला आले, पण उमेदवारी अर्ज दाखल करायला आत आले नाहीत, कारण त्यांना माहित आहे, हा बजरंग माझ्या लहान बहिणीच्याविरोधात पराभूत झाला आहे, आता तर मोठी बहिण पंकजाताईंच्या विरोधात हे निवडणूक लढवत आहेत. मग त्यांचा निभाव लागेल का? असा प्रश्न त्यांना पडला असावा. बहुरंगीला शिवरायांसमोर शपथ घ्यावी लागली की, मी मॅनेज उमेदवार नाही. याचा अर्थ काय? असा सवाल करत धनंजय मुंडे म्हणाले बजरंग सोनवणेंनी खोटी शपथ घेतली. वास्तविक अशी शपथ घ्यायची त्यांना गरज का पडली, हा खरा प्रश्न असल्याचे ते म्हणाले. शेतकरी पुत्र म्हणून घेणार्या सोनवणेंनी मराठा आरक्षणाचा सर्वात आधी लाभ घेतला हे सांगताना पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी २०१९ चा शासन निर्णय उपस्थितांना दाखवत बजरंग सोनवणेंचे कुणबी प्रमाणपत्रही त्यांनी दाखवले. १४ जानेवारीला त्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले. नंतर त्यांनी याच प्रमाणपत्राधारे केजच्या निवडणूकीत अर्ज भरला. असे सांगत बजरंग सोनवणे यांचा बुरखा टराटरा फाडला. हे उमेदवार कधी लोकांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर आंदोलनाला बसले का? हे काय जिल्ह्यातील जनतेचे भले करणार का? असा सवाल केला. दुसरीकडे पंकजाताई मुंडे यांनी जात-पात-धर्माच्या पलीकडे जावून जिल्ह्याच्या विकासासाठी योगदान दिले. त्यामुळे जिल्हा सुजलाम-सुफलाम करण्यासाठी पंकजाताईंना प्रचंड मतांनी विजयी करा.यावेळी भाजप नेते रमेश आडसकरांनी आपल्या भाषणात मविआचे उमेदवार बजरंग सोनवणेंवर शेलक्या शब्दात टिका केली. ‘समोरच्या उमेदवाराला माझे सांगणे आहे,वेळ गेलेली नाही, अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. कारण मी, आ.सुरेश धस यांनीही लोकसभा निवडणूक मुंडे साहेबांविरुध्द लढलो, आमचा निभाव लागला नाही. तरीही बजरंग सोनवणेंना हे का कळलं नाही’ असे सांगत जुन्या राष्ट्रवादीने मुद्दाम त्यांना उमेदवारी दिली असा उपरोधिक टोलाही रमेश आडसकरांनी लगावला. आडसकरांच्या या भाषणा उपस्थितांनी प्रचंड टाळ्या देत प्रतिसाद दिला.महायुती भक्कमपणे बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी आहे. पंकजाताई मुंडे या दिल्लीत जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करताना जिल्हा विकासाच्या उंचीवर नेवून ठेवतील हा विश्वास सर्वांना आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेने आरक्षणाच्या मुद्यावरुन विरोधकांकडून केला जात असलेला बुध्दीभेद ओळखावा. वास्तविक राज्य सरकारने मराठा समाजाला विधानसभेत विशेष अधिवेशन घेवून १० टक्के आरक्षण दिलेले आहे. ते आरक्षण न्यायालयातसुध्दा टिकावे यासाठी अभ्यासू अहवालही तयार केलेला आहे. म्हणून मराठा समाजानेही विरोधकांच्या चूकीच्या भूलथापांना बळी न पडता पंकजाताईंना बीड जिल्ह्याचे खासदार म्हणून विक्रमी मताधिक्य द्यावे.जिल्ह्यातील जनता सुज्ञ आहे. त्यांना आपला विकास कोण करु शकते, हे चांगले माहित आहे. त्यामुळे पंकजाताईंना प्रचंड मताधिक्क्याने निवडून देण्यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मेहनत घेवून येत्या १३ तारखेला पंकजाताईंना विजयी करत दिल्लीत संसदेत बीड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करायला पाठवावे असे आवाहन गेवराई मतदार संघाचे आ.लक्ष्मण पवार यांनी केले.जिल्हा विकसित करण्यासाठी, तरुणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी आपल्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना सर्व जिल्ह्यातील मतदारांनी मतदान करुन विजयी करावे. आपण इतके दिवस एकमेकांच्या विरोधात निवडणूका लढवल्या, मात्र आता आपली महायुती झाली आहे. त्यामुळे ही निवडणूक एकतर्फी जिंकून देत पंकजाताईंच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा. भविष्यातील काही मिळायचे असेल तर ते महायुतीतूनच मिळेल त्यामुळे आपल्या राजकीय महत्वाकांक्षेला आवर घाला. संपूर्ण देशातून पंकजाताई मुंडे सर्वाधिक मताधिक्क्याने निवडून येतील. बीड जिल्ह्यात, ब्राह्मण, वाणी,तेली समाजाचे उमेदवार खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. म्हणजेच जिल्ह्यात अजूनही जातीपातीच्या राजकारणाला थारा मिळालेला नाही हे लक्षात घेवून जनतेने मतदान करावे असे आवाहन आ.प्रकाश सोळंके यांनी केले.आ.प्रकादादा आता पुढचा काहीच विचार करायचा नाही. यापुढे आता या महायुतीतील कोण कोणत्या चिन्हावर लढेल हे काहीच आता सांगता येत नाही. इतकी सारी राजकीय स्थिती बदललेली आहे असे सांगत आ.सुरेश धस यांनी उपस्थितांमध्ये चांगलाच हशा पिकवला. उद्या जे व्हायचं ते होईल पण आता मात्र आपल्या सर्वांना पंकजाताईंना एकदिलाने निवडून आणायचे आहे. अब की बार चारसो पार असे भाजपने सांगितल्यानंतर कॉंग्रेस व त्यांच्या मित्रपक्षाने अबकी बार पाचसो पार असे म्हणावं, मात्र त्यांची अवस्था केविलवाणी झालेली आहे, मात्र आम्ही चारसो पार म्हटलं की, विरोधक मुस्लिम समाजात सीएएवरुन चूकीचे गैरसमज पसरवतात. संविधान बदलणार म्हणून आमच्या विरोधात चूकीचे वक्तव्य ते करतात. मात्र घटना कोणीच बदलू शकत नाही. आमच्या विरोधकांना जनता चांगले ओळखते. वास्तविक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व घटकांचा विकास केला. गरिबांना न्याय दिला आहे हे सांगताना आ.धस यांनी महाविकास आघाडी सरकारने अभिनेत्री कंगणा राणावत, केंद्रिय मंत्री नारायण राणे, टीव्ही पत्रकारांचा सत्तेचा गैरवापर करुन केलेला छळ उपस्थितांसमोर मांडला. दोन हॉर्वेस्टरचे मालक शेतकरी पुत्र कसे? असा सवाल करत त्यांनी बजरंग सोनवणेंवर टिका केली. भाजप सरकारमध्ये मंत्री असताना पंकजाताईंनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून केलेली रस्त्यांची कामे, तांड्यापर्यंत दिलेल्या सुविधा, महिला व मुलींच्या कल्याणाच्या राबवलेल्या योजना अन् मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी राबवलेल्या योजनांचा आढावा घेत विकासाभिमुख नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करुन संसदेत पाठवण्याचे आवाहन केले.ही आजची सभा खर्या अर्थाने विजयाची सभा आहे. पंकजाताईंनी पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी किती विकास कामे केली हे मी सांगणे म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्यासारखे आहे. मला सांगा, भारत देश जगात तिसरी महासत्ता होतोय, यासाठी नव्हे तर आमच्या लाडक्या पंकजाताईंना त्यांच्या योग्यतेच्या पदावर पुन्हा बसवण्यासाठी तुम्हाला ही निवडणूक महत्वाची वाटते हे मला चांगले माहित आहे. मला माहिती आहे, संपूर्ण राज्यभरातून आज लोकं इथे आले आहेत, त्यामुळे ही खर्या अर्थाने विजयाची सभा मी मानते. पंकजाताईंना तुम्हा सर्वांचे मतरुपी आशिर्वाद द्या, अन् माझ्यापेक्षा जास्त विक्रमी मताधिक्याने निवडून द्या. तुमच्यापैकी कोणालाही पंकजाताईंकडे कामे घेवून जाताना फार विनंत्या कराव्या लागल्या नाही. पंकजाताईंनी बोलावून घेत गाव विकासासाठी निधी दिला. त्यामुळे ताईंनी जे विकासाचे योगदान दिले त्याची परतफेड करण्यासाठी आपण कोणीही कमी पडू नये. हे तेच मैदान आहे जिथे २०१९ मध्ये मी भाषण केले होते. मात्र मी कोणावरही टिका करत नाही. २०१९ ला साहेबांच्या बारकीला तुम्ही विजयी केले. आता या निवडणूकीत तुम्ही साहेबांच्या मोठीला मोठ्या मताधिक्याने विजयी करा. दिग्गज नेते आपल्या सोबत आहेत. त्यामुळे प्रत्येक विधानसभा मतदार संघातून २० हजारांची जरी वाढीव मताधिक्य दिले तर आपल्या पंकजाताई ५ लाखांच्या मताधिक्क्याने सहज विजयी होतील असा विश्वासही खा.प्रितमताई मुंडे यांनी व्यक्त केला.

# बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने रावसाहेब काळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**अहमदनगर । प्रतिनिधी**

बहुजन मुक्ती पार्टीचे नगर दक्षिणचे उमेदवार रावसाहेब काळे यांनी गुरुवारी (दि.२५ एप्रिल) उमेदवारी अर्ज दाखल केला. शहरातून पारंपारिक वाद्यांसह मिरवणुक काढून महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. या रॅलात बहुजन मुक्ती पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन रॅलीचे प्रारंभ झाले. माळीवाडा येथील महात्मा फुले व मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन शहरातून रॅली काढण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रमुख पदाधिकार्यांनी काळे यांचा उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला. यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष शिवाजी भोसले, भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुभाष आल्हाट, छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, ख्रिश्चन मोर्चाचे अजय देठे, बेरोजगार



मोर्चाचे राहुल पगारे, मुस्लिम मोर्चाचे खालीद खान, बहुजन क्रांती मोर्चाचे युसुफ शेख, धडक जनरल कामगार संघटना श्रीधर शेलार, छत्रपती क्रांती सेनेचे उत्तम पवार, बी.एम.पी. चे ड. प्रकाश आदी उपस्थित होते.

रावसाहेब काळे म्हणाले की, लोकसभेत जिल्ह्याचे नेतृत्व करणारा खासदार हा सर्वसामान्यांतून आलेला व सर्वसामान्यांची प्रश्न मांडणारा असला पाहिजे. दक्षिणेत प्रभावी नेतृत्व मिळाले नसल्याने अनेक प्रश्न प्रलंबीत आहे. सर्वसामान्य कामगार, बेरोजगार युवक व शेतकर्यांसाठी माझी उमेदवारी आहे. नागरिकांसमोर शहराच्या नामांतरासारखे खोटे प्रश्न उभे करून दिशाभूल केली जात आहे. बेरोजगारी, महागाई, आरोग्य व शिक्षणाच्या प्रश्नावर बोलण्यासाठी उत्तर नसल्याने नागरिकांमध्ये भावनिक वातावरण निर्माण करण्याचे काम सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.काळे यांच्या उमेदवारीस भारत मुक्ती मोर्चा इंडियन प्रोफेशनल असोसिएशन, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, भारतीय बेरोजगार मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्रीय किसान मोर्चा, छत्रपती क्रांती मोर्चा या सर्व संघटनेने पाठिंबा जाहीर केला आहे.

# बहुजन समाज पार्टीच्या वतीने उमाशंकर यादव यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**अहमदनगर । प्रतिनिधी**

बहुजन समाज पार्टीच्या वतीने नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीसाठी उमाशंकर यादव यांनी उमेदवारी अर्ज गुरुवारी (दि.२५ एप्रिल) दाखल केला.

पक्षाच्या प्रमुख पदाधिकार्यांसह यादव यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज सुपुर्द केला. यावेळी जिल्हा प्रभारी सुनील ओहोळ, जिल्हा महासचिव मेजर राजू शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, ज्येष्ठ नेते सलीमभाई अत्तार, जिल्हा सचिव सुभाष साबळे, पक्षाचे दक्षिण लोकसभा अध्यक्ष शशिकांत नवगिरे, शहराध्यक्ष फिरोज शेख पत्रेवाला, महिला शहराध्यक्ष मनीषा जाधव, माजी शहराध्यक्ष प्रतीक जाधव, संतोष मोरे, गणेश बागल, जवाहर पठारे, शंकर वंजारे, राहुरी विधानसभा अध्यक्ष संजय संसारे, राहुरी शहराध्यक्ष रवी भालेराव, कोळगे, मनतोडे आदी उपस्थित होते.


उमाशंकर यादव पक्षाचे जिल्हाध्यक्ष असून, त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची दखल



घेऊन नुकतीच त्यांना पक्षाच्या वतीने उमेदवारी जाहीर झाली होती. उमाशंकर यादव म्हणाले की, बहुजन समाज पार्टीत सर्वसामान्यांच्या हातात नेतृत्व देण्याचे काम केले जात आहे. एका कंपनीतील कामगारांना पक्षाने उमेदवारी देऊन त्याच्या कार्यादी दखल घेतली आहे. इतर पक्षात घराणेशाही सुरु असून, सर्वसामान्यांना संधी दिली जात नाही. प्रस्थापितांविरोधात बसपा लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. जिल्ह्यात सत्ताधारी व विरोधक फक्त राजकारणात मश्गुल असल्याने त्यांना युवकांचा रोजगार, महिलांचे प्रश्न व इतर समस्या सोडविण्यात आलेल्या नाहीत. जिल्ह्यातील युवक आजही कामानिमित्त व शिक्षणासाठी मोठ्या शहरात जात आहे. जिल्ह्यातील नेत्यांनी फक्त स्वत:च्या शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. मात्र सर्वसामान्यांच्या शिक्षणाची जाणीव त्यांना नाही. ही निवडणुक फक्त खोट्या घोषणा करुन मतदारांची फसवणुक करणाऱ्यांविरोधात पर्याय म्हणून उमेदवारी करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर भविष्यात जिल्ह्याच्या दृष्टीकोनाने उद्योगधंदे, युवकांचा रोजगार, महिलांचे प्रश्न व शिक्षणाच्या सोयी-सुविधांसाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे सभा

# विखे कुटुंबातील नंतरच्या पिढ्यांनी काय दिवे लावले शरद पवार यांची विखे पिता पुत्रावर घणाघाती टीका





**पारनेर । प्रतिनिधी**

स्व.धनंजय गाडगीळ, विठ्ठलराव विखे यांनी आशिया खंडातील पाहिला सहकारी साखर कारखाना उभा केला.त्यानंतर विखे यांच्या नंतरच्या पिढ्यांनी काय दिवे लावले असा सवाल करतानाच,त्यांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली असून आपले अपयश झाकण्यासाठी ते आता टीका टिपन्नी करीत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) अध्यक्ष शरद पवारांनी केला.

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत शरद पवार बोलत होते. यावेळी माजी खासदार प्रसाद तनपुरे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, आमदार लहू कानडे, मा. आ. दादा कळमकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, 'आप'चे जिल्हाध्यक्ष राजू आघाव, रावसाहेब म्हस्के, संदीप वर्पे, योगिता राजळे, अरूण कडू, किरण कडू, अरूण तनपुरे, सचिन म्हसे, अमृत धुमाळ, राजूभाऊ शेटे, धनराज गाडे, बाळासाहेब आढाव, प्रकाश देठे, सुरेश वाबळे, मच्छिंद्र सोनवणे, संपत म्हस्के यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

पवार म्हणाले की,दुष्काळी जिल्हा म्हणून नगरची ओळख होती.त्या काळात जिरायत भागाच्या जमीनी बागायती करण्यासाठी निळवंडे प्रकल्प उभा करण्याचा निर्णय झाला. मात्र त्यावेळी,आज जे लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातील विरोधी उमेदवार आहेत त्यांच्या वाडवडीलांनी निळवंडेला विरोध केला.आता ते पुन्हा लोकसभेमध्ये जाऊ पाहत आहेत.त्यांना रोखण्याचे काम करावेच लागेल असे पवार म्हणाले.

खा.विखे यांना टोला लगावताना पवार म्हणाले की,कोणी इंग्रजी बोलतो म्हणून शहाणा झाला असे होत नाही. तुमचे इंग्रजी बोलणे तुम्हाला लखलाभ. नीलेश लंके यांच्यासारखा फाटका माणूस,फाटक्या माणसाच्या हिताची जपवणूक करणारा असल्याने लंके यांना मताधिक्क्याने लोकसभेत पाठवण्याचे आवाहन पवार यांनी केले.

दहा वर्षे ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांनी काय काम केले असा सवाल करून पवार म्हणाले, मोदी सरकारने केलेली कामे या निवडणुकीच्या प्रचारात मांडली पाहिजेत मात्र तसे होताना दिसत नाही. दहा वर्षांपूर्वी मनमोहनसिंग यांच्यावर टीका करून मोदी हे महागाईवर बोलत होते. सत्ता हाती दिल्यानंतर १५ दिवसांत ५० टक्के महागाई करणार असे मोदी सांगत होते. ७० रूपयांचे पेट्रोल १०६ रूपयांवर गेले हे पन्नास टक्के महागाई करण्याचे वचन का ? ४०० रूपयांचे सिलेंडर ११६० वर गेले असल्याचे पवार म्हणाले. या निवडणूकीत मोदी गॅरंटीचा गवगवा केला जातोय. ही टीकाऊ गॅरंटी नाही. त्यांच्या गॅरंटीचा चेक वटत नाही. मोदी यांनी सत्तेचा गैरवापर केला. ईडी, सीबीआयच्या माध्यमातून खोट्या केसेस केल्या. त्यांच्या विचाराविरोधात वागले तर इडी, सीबीआयचा वापर करून त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे पवार म्हणाले. राज्यात उत्तम साखर कारखाना म्हणून ओळख असलेला राहुरी साखर कारखाना, मुळा प्रवरा वीज संस्था या संस्था विखे यांनी बंद पाडल्या. शासकीय मेडीकल कॉलेज जिल्ह्यात होऊ दिले नाही.त्यांच्या खासगी मेडीकल कॉलेजमध्ये प्रवेश कशा पध्दतीन दिले जातात, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. जिल्ह्यात सत्तेचा गैरवापर, दमदाटी सुरू असल्याचा आरोप पवारांनी केला. आमचा उमेदवार दिसायला फाटका आहे. दहा बाय दहाच्या खोलीत राहणारा हा माणूस. कांदा, कापूस, सोयाबिन आदी शेतकरी वर्गाशी निगडीत प्रश्न, स्पर्धा परिक्षा देणारे विद्यार्थी, वंचितांचे प्रश्न मांडण्यासाठी नीलेश लंके हेच एकमेव उत्तर असल्याचे पवार म्हणाले. केंद्रात कृषीमंत्री असताना शरद पवार यांनी जे निर्णय घेतले असे निर्णय इतर कोणत्याही मंत्रयाने घेतले नाहीत. आपला देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. याच कृषीप्रधान देशात शेतकरी आत्महत्या करतोय ही शोकांतीका आहे. कांदा, सोयाबिन, कपाशी, दुधाच्या भावाची आज काय स्थिती आहे ? दुधाला ५ रूपये अनुदान देतो म्हणाले ते देखील मिळाले नाही. मग शेतकरी कसा सुखी होणार ? ज्यांना पाच वर्षापूर्वी आपण दिल्लीला पाठविले ते शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एकदाही बोलले नाहीत. अलिकडेच विखे पिता पुत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भेटले. कांदा निर्यात बंदी उठविण्यासाठी भेट घेतल्याचा गवगवा केला. नगरच्या बाजार समितीमध्ये सत्कार स्विकारात निर्यात बंदी उठविली गेली नसती तर मते मागण्यासाठी गेलो नसतो अशी बतावणीही केली. निळवंडे, साकळाई, ताजनापुर या योजना झाल्या नाही तर निवडणूकीचा अर्ज भरणार नाही अशी प्रतिज्ञा करणारे खासदार यांचे काम खोटे बोल व रेटून बोल असे आहे. त्यांचे काम मात्र शुन्य आहे. विखे कुटूंबाने गेल्या ५० वर्षात जिल्हयात एखादा मोठा प्रकल्प आणला का ? दहा, विस हजार तरूणांना रोजगार मिळाला का ? त्यांच्या घराकडे जाणारा नगर-मनमाड रस्ता त्यांना करता आला नाही ते खासदार विकासाच्या काय गप्पा मारतात ? मी कांद्याच्या भावासंदर्भात आंदोलन केले, त्यामुळे माझ्यावर गुन्हा दाखल झाला, त्यामुळे मी गुंड का असा सवाल लंके यांनी यावेळी बोलताना केला. मला एकदा संधी द्या अशी भावनीक साद घालत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संसद बंद पाडली नाही तर नाव बदलेल असे सांगत जे बोलतो तेच करतो. व जे करतो तेच बोलतो. दुसऱ्याच्या खांद्यावर पंढरपूर करणारा मी नसल्याचे सांगतानाच महाराष्ट्रामध्ये विधानसभेमध्ये महाविकास आघाडीचीच सत्ता येणार असल्याचा विश्वास लंके यांनी व्यक्त केला. काल, परवा विरोधकांची सभा झाली. ५०० रूपये देऊन असे सांगून गर्दी जमा केली. १०० रूपये आगाऊ रक्कम दिली त्यानंतर उरलेली रक्कम दिलीच नाही.आज आमच्या सभेला पैसे देऊन गर्दी जमा केलेली नाही.येथे स्वाभिमानी नागरीकांची गर्दी असल्याचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी सांगितले.

# निलेश लंके यांच्या प्रचारासाठी संभाजी ब्रिगेडची फौज मैदानात

## 'शेतकऱ्यांचा आसूड' पुस्तक भेट देत जाहीर केला पाठिंबा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी संभाजी ब्रिगेडच्या नाशिक येथे झालेल्या मीटिंग मध्ये महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्यांनातर संभाजी ब्रिगेड अहमदनगर दक्षिणच्या वतीने महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांची भेट घेऊन त्यांना महात्मा फुले लिखित शेतकऱ्यांचा आसूड हे पुस्तक भेट देण्यात आले. त्यांना पाठींबा जाहीर करत त्यांच्या प्रचारासाठी संभाजी ब्रिगेडची फौज मैदानात उतरणार असल्याचे संभाजी ब्रिगेडचे शेतकरी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संग्राम देशमुख यांनी सांगितले.



महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांना वेळ देऊन विविध प्रश्नांच्यावर चर्चा केली तसेच शेतकऱ्यांच्यासाठी सदैव लढत राहणार असल्याचे सांगितले. साकळाई पाणी प्रश्न सोडविणार असल्याचे तसेच शेतकऱ्यांच्या कांदा, दूध,कापूस, सोयाबीन यासारख्या पिकांना हमीभाव आणि शेतकऱ्यांना स्वामींनाथन आयोग लागू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे श्री.लंके यांनी संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले

अहमदनगर दक्षिण मधील संभाजी ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते निलेश लंके यांचा प्रचार करून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करणार असल्याचे संभाजी ब्रिगेडच्या वतीने सांगण्यात आले.

यावेळी संग्राम देशमुख, अहमदनगर जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे, जिल्हा कार्याध्यक्ष सुनील ढवळे, जिल्हा संघटक गणेश पारे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष नानाजी शिंदे, कर्जत तालुकाध्यक्ष नवनाथ धनवे, केशव देशमुख, मयूर धनवडे, महेश लाहोर ,मुन्ना मुंडे यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी उपस्थित होते.

# निलेश लंके यांच्या प्रचारार्थ महा आघाडीचा नगर तालुक्यात प्रचार दौरा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ शिवसेना जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे यांच्या नेतृत्वाखाली महाआघाडीच्या वतीने नगर तालुक्यात झंझावाती प्रचार दौरा बुधवार (दि.२४) पासून सुरू करण्यात आला आहे. नगर तालुक्यात भातोडी येथुन प्रचार दौऱ्याचा प्रारंभ करण्यात आला, त्यास जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.



यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते संपतराव म्हस्के, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उध्दवराव दुसुंगे, तालुकाध्यक्ष रोहिदास कर्डिले, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब हराळ यांच्या सह स्थानिक महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दि. १ मे पर्यंत दररोज तालुक्यातील गावागावात हा दौरा काढला जाणार असून त्यात सहभागी होण्याचे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र भगत, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रोहिदास कर्डिले, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अरुण म्हस्के यांनी केले आहे.

निलेश लंके यांच्या उपस्थितीत गुरुवारी मोटारसायकल रॅली


महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके हे गुरुवारी (दि.२५) सकाळी ८ वाजता नगर तालुक्यातील मेहकरी फाटा येथे उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत मेहकरी फाटा ते कौडगाव भव्य मोटारसायकल रॅली होणार असून जास्तीत जास्त तरुणांनी व ग्रामस्थांनी सहभागी व्हावे. असे आवाहन पंचायत समितीचे माजी सभापती संदीप गुंड यांनी केले आहे.

## ३७-अहमदनगर लोकसभा मतदारसंघात

# नामनिर्देशपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी २७ उमेदवारांनी दाखल केले ३२ नामनिर्देशनपत्र









**अहमदनगर । प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत ३७-अहमदनगर लोकसभा मतदारसंघात नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी २७ उमेदवारांनी ३२ नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. आज नामनिर्देशनपत्र दाखल केलेले २७ उमेदवार व यापूर्वी नामनिर्देशन पत्रदाखल केलेले १६ उमेदवार अशा प्रकारे नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या एकूण उमेदवारांची संख्या ४३ एवढी झाली आहे.

नामनिर्देशनपत्र भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी गोरख दशरथ आळेकर (अपक्ष), दोन नामनिर्देशनपत्र, डॉ योगिता प्रविण चोळके (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, उमाशंकर श्यानमबाबु यादव (बहुजन समाजपार्टी) एक नामनिर्देशनपत्र, सुर्यभान दत्तारत्रय लांबे (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, जहीर युसुफ जकाते (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, प्रा. सुनिलराव मोहनराव पाखरे (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र व भारतीय जनता पार्टीतर्फे एक नामनिर्देशनपत्र, शिवाजीराव वामन डमाळे (सैनिक समाज पार्टी) एक नामनिर्देशनपत्र, कलीराम बहिरु पोपळघट (भारतीय नवजवान सेना पक्ष) एक नामनिर्देशनपत्र, शितोळे सुदर्शन लक्ष्मलण (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र व हिंदू एकता आंदोलन पार्टी एक नामनिर्देशनपत्र, शेकटकर अनिल गणपत (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, मुक्ता प्रदीप साळुंके (इंन्सालनियत पार्टी) एक नामनिर्देशनपत्र, मदन कानिफनाथ सोनवणे (राईट टू रिकॉल पार्टी) एक नामनिर्देशनपत्र, आरती किशोरकुमार हालदार (प्रबुद्ध रिपब्लीदकन पार्टी) एक नामनिर्देशनपत्र, दिलीप कोंडीबा खेडकर (वंचित बहुजन आघाडी) एक नामनिर्देशनपत्र व (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, निलेश साहेबराव लंके (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, रावसाहेब शंकर काळे (बहुजन मुक्ती पार्टी) एक नामनिर्देशनपत्र, गंगाधर हरिभाऊ कोळेकर (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, प्रविण सुभाष दळवी (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, मनोरमा दिलीप खेडकर (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, बिलाल गफुर शेख (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, प्रतिक अरविंद बारसे (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, राणी निलेश लंके (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, परवेज उमर शेख (ऑल इंडिया मजलिस-इत्तेफहादुल मुस्लिमीन) एक नामनिर्देशनपत्र, शेळके विश्वेनाथ श्रीरंग (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, ज्ञानदेव कारभारी पाडळे (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, शरद बाबुराव माघाडे (अपक्ष) एक नामनिर्देशपत्र, हनुमंत देविदास पावणे (अपक्ष) दोन नामनिर्देशनपत्र उमेदवारांनी आज नामनिर्देशनपत्र दाखल केले.

यापुर्वी दि.२२ एप्रिल रोजी भारतीय जनता पार्टीतर्फे डॉ. सुजय विखे पाटील यांनी तीन नामनिर्देशनपत्र, डॉ. कैलाश निवृत्ती जाधव- महाराष्ट्र विकास आघाडी एक नामनिर्देशन पत्र, भागवत धोंडीबा गायकवाड-समता पार्टी एक नामनिर्देशनपत्र तर ॲड.महंमद जमीर शेख-अपक्ष यांनी एक नामनिर्देशन पत्र दाखल केले.

दि. २३ एप्रिल निलेश ज्ञानदेव लंके (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार) यांनी दोन नामनिर्देशनपत्र, वाबळे भाऊसाहेब बापूराव (भारतीय जवान किसान पार्टी) एक नामनिर्देशनपत्र,नवशाद मुन्सीलाल शेख (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, दत्तात्रय आप्पा वाघमोडे (राष्ट्रीय जनक्रांती पार्टी) एक नामनिर्देशनपत्र,गिरीश तुकाराम जाधव (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र दाखल केले.

दि. २४ एप्रिल रोजी मदन कानिफनाथ सोनवणे (राईट टु रिकॉल पार्टी) यांनी एक नामनिर्देशनपत्र, कोठारी रवींद्र लिलाचंद (अपक्ष) दोन नामनिर्देशनपत्र, अमोल विलास पाचुंदकर (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र, प्राजक्तअ प्रसादराव तनपुरे (नॅशनलिस्टव काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार) तीन नामनिर्देशनपत्र, महेंद्र दादासाहेब शिंदे (वंचित बहुजन आघाडी) एक नामनिर्देशनपत्र व अपक्ष एक नामनिर्देशनपत्र, गावडे मच्छिंद्र राधाकिसन (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र तर पानसरे छगन भिकाजी (अपक्ष) एक नामनिर्देशनपत्र दाखल केले.

२६ एप्रिल रोजी उमेदवारी अर्जांची छानणी करण्यात येणार आहे. २९ एप्रिल ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .